नियमीत फौ. ख.क्र. ९१/२०११
सरकार विरुध्द परशुराम वगैरे
निशाणी क्र. १४७

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र (१०) यांची जबानी.

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांवः– राम चंद्रकांत चिंतामणी

वय सुमारेः– ६० वर्ष, व्यवसायः– सराफ व्यवसाय

निवासस्थानः– पाथर्डी, ता. पाथर्डी जि. अहमदनगर

## सर तपासणी

## अभियोग पक्षाकरिता श्रीमती. ए. बी. कुलकर्णी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.

फिर्यादी मुकूंद हा माझा भाउ आहे. आरोपी हे भविष्य सांगत असल्याने मी त्यांना ओळखत होतो. माझे बंधु फिर्यादी मुकूंद व सुभाष सानप हे वंजरवाडी, ता. करमाळा येथे परशुराम महाराज बिनवडे यांच्याकडे कुंडली पाहण्याकरीता गेले होते. त्यावेळी परशुराम बिनवडे यांनी माझ्या भावाला तु भाग्यवान आहेस, तुझ्या घरामध्ये ३६ किलो सोने आहे. त्यानंतर परशुराम महाराज यांनी माझ्या भावाला मी तुमच्या घरी येऊन पाहतो व सांगतो असे म्हणाले. त्यानंतर आरोपी क्र.१ ते ४ माझ्या भावाचे घरी आले व माझ्या भावाला म्हणाले की, तुम्हाला मला ४० लाख रुपये द्यावे लागतील. त्यानंतर माझ्या भावाने आरोपींना एवढे पैसे देणे होणार नाही असे सांगितले व ३० लाख रुपये देण्याचे कबुल केले व ते टप्या टप्याने देण्याचे ठरले. त्यानंतर माझ्या भावाने उषाताई बडे यांच्याकडुन दिड लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. माझा भाऊ व सुभाष सानप असे दोघे जाऊन त्यांनी आरोपी क्र.१ याला दिड लाख रुपये दिले. त्यानंतर आमची शेवगाव तालुक्यातील जमीन विक्री करुन सहा लाख रुपये, तसेच ७,५०,०००/– पोस्ट बचत व प्लॉट विक्री करुन आरोपी क्र.१ याला दिले. त्यानंतर पाच लाख रुपये आरोपी क्र.१ याला माझ्या भावाने दिले. त्यानंतर पुन्हा तीन लाख रुपये महाराष्ट्र बॅकेतुन काढुन एम. एम. नि–हाळी विद्यालय समोर मी व माझ्या बंधुने आरोपी क्र.१ याला दिले. त्यानंतर माझ्या सराफ दुकानातुन माझा भाऊ व मेहुणे यांच्यासमक्ष एक लाख व दिड लाख अशी रक्कम आरोपी क्र.१ याला दिली होती. असे एकुण रक्कम सत्तावीस लाख रुपये आम्ही आरोपी यांना दिले होते. त्यानंतर सर्व आरोपी आमच्या घरी आले. आरोपी सोबत येताना केमिकल बॉटल व इतर साहित्य घेऊन आले होते. आरोपींनी घरामध्ये खड्डा करुन चार सोन्याची टिकल्या काढल्या व त्या आम्हाला दिल्या. आरोपींनी त्यानंतर उर्वरीत तीन लाख द्या बाकीचे सोने काढुन देतो असे सांगितले परंतु त्यावेळी आमच्याकडे पैसे नव्हते. त्यानंतर आम्ही पैशाची जमावा जमवी केली व

आरोपी यांना वारंवार फोन करुन बोलावले परंतु त्यांनी टाळा टाळ केली. त्यानंतर आमच्या लक्षात आले की, आमची फसवणुक झाली आहे. त्यानंतर माझ्या भावाने फिर्याद दाखल केली. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी करुन माझा जबाब नोंदवला. घटना सन २००८ ची असल्याने कोर्टामध्ये हजर असलेला आरोपी क्र.२ तोच होता किंवा कसे हे सांगु शकत नाही.

सरतपास पुर्ण.

**उलट तपासणी आरोपी क्र.२, ३ व ४ करिता श्री. जे. टी. बट्ुळे वकील**

२. आरोपींना सत्तावीस लाख रुपये बँकेतुन किंवा इतर ठिकाणातुन काढुन दिल्याबाबत कागदोपत्री पुरावा नाही. माझे मेहुणे पैसे देताना कधी आले होते याबाबत मला तारीख व वार सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या भावाने खोटी फिर्याद दाखल केली आहे. घटनेवेळी माझे सराफ दुकान छोटे होते. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर मी खोटा कथन केला आहे. प्रस्तुत प्रकरणाबाबत मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, भावाच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे.

...उलटतपास पुर्ण.

... फेर तपास ... काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

दिनांकः ०९.०३.२०२६

RAVIKIRAN VITTHAL SAPATE

Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2026.03.09 17:43:08 +0530

(**रविकिरण सपाटे** )

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

पाथर्डी जि. अहमदनगर.